मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 11 सप्टेंबर 2024 | पान- 1

# महापालिकेचा झिरो वेस्ट शाळा उपक्रम

## विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची सवय लागावी : महापालिकेच्या वतीने शाळा स्तरावर कचरा मुक्त शाळा उपक्रम राबविणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची सवय लागावी तसेच त्यांच्यामध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती व्हावी व महापालिकेच्या शाळा कचरामुक्त करण्यासाठी महापालिकेच्या वतीने शाळा स्तरावर कचरा मुक्त शाळा (झिरो वेस्ट शाळा) हा उपक्रम राबविणे तसेच पुणे जिल्ह्यातील 20 शिक्षकांचे पिंपरी-चिंचवड महापालिकेत वर्गीकरण करणे या विषयांसह विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय आज प्रशासक सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये प्रशासक सिंह यांनी विविध विषयांना मंजुरी दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर यांच्यासह विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने शहरात स्वच्छ पिंपरी चिंचवड शहर अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाचा भाग म्हणून महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शाळांमध्ये झिरो वेस्ट शाळा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जागृती करून त्यांच्यात लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची कौशल्य विकसित करण्यास मदत होणार आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये तीन महिन्यामध्ये एकूण 4 टप्प्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार असून त्यासाठी शाळांना निधी देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एकूण 97 शाळा या उपक्रमाअंतर्गत कचरामुक्त करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने आज हा विषय विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आला होता,त्यास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

### 20 शिक्षकांची सेवा महापालिकेत वर्गीकरण

» जिल्हा परिषद पुणे यांच्याकडील 20 शिक्षकांची सेवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबतच्या विषयाला देखील प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे. राज्य शासनाच्या नगर विकास विभाग आणि ग्रामविकास विभाग यांच्या निर्णयानुसार विहित तरतुदी, न्यायालयीन प्रकरणे व इतर सर्व प्रचलित नियम या सर्व बाबींचे पालन करून वर्गीकरणाची प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

### विशेष बैठकीतील मंजूर विषय

» महापालिकेचे रस्ते, उद्याने, मोकळ्या जागा, चौक याठिकाणी लागवडीसाठी हंगामी रोपे पुरविणे, महिला बचत गटांच्याद्वारे सामुदायिक शौचालयांचे साफसफाई व देखभाल करणे, आरोग्य विभागासाठी आवश्यक असलेले साहित्य खरेदी करणे तसेच विविध विभागातील आवश्यक कामांसाठी तरतूद वाढ, घट आणि वर्गीकरण करणे, शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा 2024-25 च्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देणे अशा विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

# तहानलेल्या चऱ्होलीकरांच्या पाणी प्रश्नावर सक्षम तोडगा काढणार : अजित गव्हाणे

## चऱ्होली परीसरातील दौऱ्यात जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या



**पिंपरी | प्रतिनिधी**

चऱ्होली परिसर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. गावठाणाबरोबरच येथे अनेक गृहनिर्माण संस्था उभारण्यात आल्या असून, साधारण 20 हजार नागरिक या परिसरात वास्तव्याला आहेत. हा परिसर वेगाने विकसित होत असताना येथे सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी कोणतेही नियोजन व्यवस्थापन करण्यात आलेले नाही, हेच या परिसरातील पाणीटंचाईचे कारण आहे. पाणीटंचाईपासून येथील नागरिकांना मुक्त करण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील. त्यासाठी सक्षम उपायोजना केल्या जातील असा विश्वास स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दिला.

चऱ्होली तसेच गावठाण परिसरामध्ये अजित गव्हाणे यांनी भेट देत नागरिकांशी चर्चा केली. यावेळी अनेक गणपती मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या भेटी घेत 'बाप्पांच्या' आरतीलाही ते उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप आबा तापकीर, दत्ताभाऊ बुर्डे, कुणाल तापकीर, सागर तापकीर, सुनील पठारे, हरिभाऊ तापकीर, सचिन तात्या तापकीर, संदीप तापकीर, प्रशांत तापकीर, गणेश ताजने, सोमनाथ तापकीर, चेतन तापकीर, शुभम तापकीर राजुशेठ वाखारे, संतोष तापकीर, विक्रम गिलबिले, श्रेयस चिखले आदी उपस्थित होते.

माजी नगरसेविका विनया तापकीर येथील पाणीटंचाई बाबत बोलताना म्हणाल्या, धरण उशाला आणि कोरड घशाला अशी आमची परिस्थिती आहे. शहरातील सर्वात वेगाने विकसित झालेला हा परिसर आहे. मा त्र नागरिकांना चार चार दिवस पाणी मिळत नाही. प्रशासकीय कारभार असल्यामुळे अधिकारीही दाद लागू देत नाही. वारंवार टाक्या भरल्या जात नाहीत असे एकच कारण दिले जाते आणि नेहमीच पाणीटंचाई आमच्या माथी मारली जाते. आमच्या भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी ठोस उपाय योजना गरजेच्या असल्याचे तापकीर यावेळी म्हणाल्या.

नागरिकांशी संवाद साधताना अजित गव्हाणे म्हणाले, चऱ्होली सारख्या विकसनशील भागात पाण्याचे नियोजन करताना पुढील किमान वीस वर्षाचा विचार करणे गरजेचे आहे. चऱ्होलीसाठी अशाच नियोजनाची गरज आहे. असे नियोजन सध्याच्या राज्यकर्त्यांना जमले नाही ही शोकांतिका आहे. गेल्या दहा वर्षात या भोसरी विधानसभा मतदारसंघाला अधोगतीच्या मार्गावर नेण्याचे काम सत्ताधारी भाजप व त्यांच्या आमदारांनी केले आहे. भोसरी विधानसभेला पुन्हा एकदा विकासाच्या मार्गाने पुढे नेण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

### "आम्ही परिवर्तन घडवणार"

» यावेळी नागरिक, पदाधिकारी यांनी अजित गव्हाणे यांच्यासमोर परिसरातील समस्यांबाबत चर्चा केली. पाणी टंचाई, खंडित आणि अनियमित वीज पुरवठा, खड्डे यांसारख्या समस्यांमुळे आम्ही त्रस्त आहोत त्यामुळे आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत परिवर्तन घडवणार असल्याच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.

# सचिन गायकवाड यांनी भरला 'पक्ष उमेदवारी अर्ज'

## पक्ष उमेदवारी अर्ज पक्षाच्या पिंपरी मध्यवर्ती कार्यालय येथे जमा केला आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाकडून येणाऱ्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी पक्ष उमेदवारी अर्ज मागवण्यात आले आहेत. हे अर्ज पिंपरी मध्यवर्ती कार्यालय येथे उपलब्ध होते. पिंपरी विधानसभेसाठी इच्छुक असलेले पक्षाचे सरचिटणीस सचिन गायकवाड यांनी पक्ष उमेदवारी अर्ज पक्षाच्या पिंपरी मध्यवर्ती कार्यालय येथे जमा केला आहे.

सचिन गायकवाड यांचा पिंपरी विधानसभेतील सामाजिक कार्यात हिरारीने पुढाकार असतो. त्यांचा मोठा जनसंपर्क तसेच मित्रपरिवार या मतदारसंघात आहे. सर्वसामान्य कुटुंबातून असल्यामुळे जनतेच्या प्रश्नांची जाण त्यांना चांगल्या प्रकारे आहे. म्हणूनच पिंपरी विधानसभेतून उमेदवारी मिळाल्यास नक्कीच विजय होईल असा विश्वास सचिन गायकवाड यांनी व्यक्त केला आहे.

पिंपरी विधानसभेतून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून इच्छुकांची संख्या मोठी आहे. माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत, देवेंद्र तायडे, मयूर जाधव हे तीव्र इच्छुक आहेत. आता सचिन गायकवाड यांनी देखील पक्षाकडे उमेदवारी मागितल्यामुळे चांगलीच चुरस निर्माण झाली आहे.

# कोथरुड मधील वाहतूक समस्यांसंदर्भात दर आठवड्याला बैठक

## वाहतूक समस्यांसंदर्भात सर्वांना एक व्हॉट्सअॅप नंबर द्या : चंद्रकांत पाटील यांचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

कोथरुड मधील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने प्राधान्य क्रम ठरवून जलदगतीने उपाययोजना कराव्यात. नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने व्हॉट्सअॅप नंबर उपलब्ध करून द्यावे.

कोथरुड मधील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने प्राधान्य क्रम ठरवून जलदगतीने उपाययोजना कराव्यात. नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने व्हॉट्सअॅप नंबर उपलब्ध करून द्यावे. जेणेकरून त्याद्वारे ही वाहतूक नियमन करणे शक्य होईल असे निर्देश नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी आज दिले. कोथरुड मधील वाहतूक समस्यांसंदर्भात नामदार चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी पुणे शहर वाहतूक शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, पथ विभाग प्रमुख अनिरुद्ध पावसकर, कार्यकारी अभियंता अभिजीत डोंबे यांच्या सह वाहतूक पोलीस अधिकारी, विविध सामाजिक कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी कोथरूड मधील मुख्य रस्त्यांवरून प्रतिदिन एक लाख ४० हजार वाहने फिरत असल्याचे सांगून वाहतूक नियमनासाठीच्या उपाययोजनांचे सादरीकरण केले. यामध्ये प्रामुख्याने पौड रोड आणि कर्वे रोड येथील अभिनव चौकच्या दोन्ही बाजूचा रस्ता रुंद करणे, आनंद नगर मेट्रो स्टेशन जवळ पौड रोड रुंद करणे, कर्वे पुतळा पौड रस्त्याचे डावे वळण रुंद करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक कर्वेनगर ते वारजे पर्यंतचा रस्ता रुंद करणे किंवा सदर ठिकाणी उड्डाणपूल उभारणे, कमीन्स गेट समोरील डी.पी. रस्ता रुंद करणे, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासमोरील रस्ता रुंद करणे, यांसह वाहतूक कोंडीची समस्या टाळण्यासाठी कोथरुड मधील मिसिंग लिंक शोधून त्या पूर्ण करणे. तसेच, रस्ता रुंदीकरणासाठी अनेक ठिकाणी जमीन हस्तांतरण आवश्यक आहे. त्यासाठी पोलीस आणि महापालिकेच्या रस्ते विभाग आणि पथ विभागाने समस्यांचे निराकरण करावे आदी उपाययोजना सुचविल्या.



### गीतांजली अमराळे यांना श्रद्धांजली

» दोन दिवसांपूर्वी कर्वे रस्त्यावरील पौड फाट्याजवळ अपघाताचाही घटना घडली. एका टेम्पो चालकाने दारूच्या नशेत गाडी चालवून अनेक गाड्यांना धडक दिल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी श्रीकांत अमराळे यांच्या पत्नी गीतांजली यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर श्रीकांत अमराळे हे गंभीररित्या जखमी झाले. त्याबद्दल दु:ख व्यक्त करुन गीतांजली अमराळे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

### व्हॉट्सअॅप नंबर उपलब्ध करून द्यावे

» तातडीने पूर्ण होऊ शकणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य क्रम ठरवून काम करावे. तसेच, नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने व्हॉट्सअॅप नंबर उपलब्ध करून द्यावे. जेणेकरून त्याद्वारे ही वाहतूक नियमन करणे शक्य होईल, असे निर्देश दिले.त्याशिवाय कोथरुड मधील वाहतूक समस्यांसंदर्भात दर आठवड्याला प्रशासनासोबत आढावा बैठक घेणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

### संदीप खर्डेकर यांची समन्वयक म्हणून नियुक्ती

» वाहतूक शाखेला मनुष्यबळ कमी पडत असल्याने वॉर्डनची संख्या वाढवावी. त्याशिवाय वाहतूक नियमनासंदर्भात जनजागृतीसाठी एनएसएसची मदत घ्यावी अशीही सूचना केली. तसेच, कोथरुड मधील वाहतूक समस्या सोडविण्यासंदर्भात प्रशासन आणि नागरीक यांच्या मधील दुवा म्हणून संदीप खर्डेकर यांची समन्वयक म्हणून नियुक्ती केली.

# सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी सोडवा नाहीतर कारवाई

## डॉ. पुलकुंडवार; लोकशाही दिनात अधिकाऱ्यांना खडसावले

**पुणे | प्रतिनिधी**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून न्याय व तत्परतेने सोडवणूक व्हावी, या हेतूने विविध पातळीवर लोकशाही दिन आयोजित करण्यात येऊन नागरिकांच्या तक्रारीवर निर्णय घेण्यात येतात.

विभागीय लोकशाही दिनामधे दाखल प्रकरणांवर सुनावणी घेऊन दिलेल्या आदेशाचे प्रशासनाने काटेकोरपणे व त्वरित पालन करून तक्रारी तातडीने सोडवाव्यात; अन्यथा त्याची गंभीर दखल घेण्यात येईल, असे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले आहेत.

विभागीय आयुक्त कार्यालय सभागृहात विभागीय स्तरावरील लोकशाही दिनातील प्रकरणांच्या सुनावणीदरम्यान ते बोलत होते.

पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, महसूल उपायुक्त अण्णासाहेब चव्हाण, नगरपालिका प्रशासन उपायुक्त पूनम मेहता, करमणूक कर उपायुक्त नीलिमा धायगुडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक मुख्य अभियंता आर. वाय. पाटील आदी या वेळी उपस्थित होते.



जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार निवारण न झालेल्या तीन प्रकरणांवर या वेळी डॉ. पुलकुंडवार यांनी अर्जदारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन सुनावणी घेतली. अर्जदारांच्या तक्रारींचे निवारण तातडीने करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

जिल्हास्तरावर सुटणाऱ्या समस्यांसाठी नागरिकांना विभागीय लोकशाही दिनात यावे लागते, हे योग्य नसून जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, आणि संबंधित अधिकाऱ्यांनी अर्जदाराच्या तक्रारी सोडवाव्यात, असे डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले.

जनतेच्या तक्रारी सोडविण्यामध्ये हलगर्जीपणा झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरीत्या जबाबदार धरून प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असेही या वेळी त्यांनी सूचित केले. या वेळी विविध विभागांचे विभागस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

# सरसकट पैशांचे वाटप करणे योग्य नाही

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांची टीका

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य कर्जाच्या गर्तेत अडकले आहे. येत्या काळात कर्मचाऱ्यांचे पगार होतील की नाही? अशी शंका आहे. अशा परिस्थितीत केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरसकट पैशांचे वाटप करणे योग्य नाही.

ज्यांना गरज आहे, त्यांना ते मिळावेत याला आमचा पाठींबाच राहील, या शब्दांत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांनी लाडकी बहीण योजनेचा उल्लेख न करता या योजनेसह शासनाच्या अन्य योजनांवर हल्लोबोल केला.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रमुख राजकीय पक्षांच्या व्हिजन २०५०ची भूमिका जाणून घेण्यासाठी वार्तालापाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पाटील यांनी त्यांच्या पक्षाची भुमिका मांडली. पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे आणि सरचिटणीस मिनाक्षी गुरव व्यासपीठावर उपस्थित होते.



राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की, राजकारणी फक्त निवडणुकीपुरता विचार करू लागले आहेत. आपले राज्य देशात अग्रेसर होते. स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांपासून रोजगाराला प्राधान्य देताना औद्योगीक क्षेत्राचा विस्ताराला प्राधान्य दिले.

परंतू, अलिकडे उद्योगाच्या दृष्टीने मुंबईतील बंदर असतील अथवा विमानतळांना देशातून स्पर्धा व्हायला लागली असून गुंतवणुकीला पर्याय निर्माण झाले आहेत. राज्यात मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर या भागातच उद्योगांचे जाळे निर्माण झाले आहे. पुण्यासारख्या शहरात सार्वजनिक वाहतूक महत्वाची आहे. तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी याला प्राधान्य दिले. मुंबईने पहिले पाऊल उचलले आता तिथे मोठ्याप्रमाणावर जाळे विस्तारले आहे.

# खड्डेमुक्त रस्त्यासाठी सद्यस्थितीचे मूल्यांकन

## स्वयंचलित तंत्रज्ञानाच्या आधारे होणार सर्वेक्षण : शहरातील रस्त्यांची गुणवत्ता वाढविण्यावर भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील रस्त्यांवरील खड्डयांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि देखभाल, दुरुस्तीसाठी महानगरपालिका लवकरच रस्ते सर्वेक्षण आणि देखभाल उपक्रम सुरू करणार आहे. यातील रस्त्यांच्या स्थितीचे मूल्यांकन हे खड्डे असलेले परिसर ओळखण्यास आणि रस्त्यांच्या आवश्यक दुरुस्तीला प्राधान्य देण्यास उपयुक्त ठरणार आहे.

या अंतर्गत स्वयंचलित तंत्रज्ञानाद्वारे (ऑटोमेटेड टेक्नॉलॉजी) एकत्रित केलेली रस्त्यांची माहिती महापालिकेच्या भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) प्लॅटफॉर्ममध्ये संकलित केली जाईल. या माहितीद्वारे सततची होणारी खड्डे दुरुस्ती टाळण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार असून रस्त्यांची एकूण गुणवत्ता वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात साधारण १ हजार ७०० किलोमीटर लांबीचे क्रॉंक्रिट व डांबरी रस्ते आहेत. या रस्त्यांची प्रत्यक्ष तपासणी आणि संरचनात्मक मूल्यांकनाद्वारे (स्ट्रक्चरल असेसमेंट) खड्डे दुरुस्ती कामांच्या गुणवत्ता वाढीला प्राधान्य दिले जाणार आहे.रस्ते दुरुस्ती आणि सुधारणा करणे, महापालिकेच्या अंदाजपत्रकाचे नियोजन करण्यासाठी नोव्हेंबर २०२४ मध्ये पहिला अहवाल सादर करण्यात येईल. तीन वर्षांसाठी हे सर्वेक्षण केले जाणार आहे.



### सर्वेक्षण-देखभाल उपक्रमाची वैशिष्ट्ये

१.एकूण रस्त्यांची लांबी - दरवर्षी शहरातील १७०० किलोमीटर रस्त्यांचे सर्वेक्षण (रस्त्यांची रुंदी ३ मीटर ते ६१ मीटर)

२. स्वयंचलित रस्ते सर्वेक्षण - रस्त्यांना भेगा पडणे, खड्डे पडणे आणि रस्ता खचणे या समस्यांची प्रत्यक्ष तपासणी. अंदाजपत्रक आणि रस्ते देखभाल नियोजनासाठी माहिती संकलन. इंडियन रोड कॉंग्रेस (आयआरसी) मार्गदर्शक तत्त्वांनुसार संरचनात्मक मूल्यांकन

३. जीआयएस प्रणालीद्वारे माहिती संकलन - रस्त्यांबाबत संकलित केलेली माहिती महापालिका जीआयएस प्रणालीवर अद्यावत करणार खड्डे दुरुस्तीवर लक्ष ठेवण्यासाठी जीआयएस प्रणालीवर आधारित ॲप तयार करणार

४. उपक्रम कालावधी - सलग तीन वर्षे दरवर्षी होणार रस्ते सर्वेक्षण (२०२४-२०२६) वार्षिक देखभाल अहवाल नोव्हेंबरपर्यंत होणार सादर

५.उपक्रमाची उद्दिष्टे - शहरातील रस्ते सुरक्षा आणि पायाभूत सुविधा सुधारण्यावर भर देणे, रस्त्यांची प्रत्यक्ष तपासणी आणि संरचनात्मक मूल्यांकनाद्वारे अंदाजपत्रकाचे नियोजन करणे. एकाच ठिकाणी सतत पडणारे खड्डे टाळणे आणि एकूण रस्त्यांची गुणवत्ता सुधारणे

### लक्ष ठेवण्यासाठी ॲप

**» सर्वेक्षणाचा एक भाग म्हणून रस्ता खचणे, खड्डे पडणे तसेच भेगा पडणे यांसारख्या प्रमुख समस्यांची नोंद केली जाईल. वार्षिक देखभाल अहवाल तयार करण्यासाठी तसेच खड्डे दुरुस्तीच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी जीआयएस-आधारित ॲपदेखील विकसित केले जाणार आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी सततची होणारी रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे टाळण्यास मदत होईल.**

"रस्ते सर्वेक्षण आणि देखभाल उपक्रम रहिवाशांना सुस्थितीत आणि सुरक्षित रस्ते प्रदान करण्याच्या महापालिकेच्या वचनबद्धतेमधील एक महत्त्वाचा टप्पा आहे. स्वयंचलित तंत्रज्ञान (ऑटोमेटेड टेक्नॉलॉजी) आणि जीआयएस प्रणालीच्या आधारे रस्त्यांच्या समस्या जलद गतीने सोडविण्यास तसेच अंदाजपत्रकातील नियोजन आणि रस्ते बांधणीच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्यास मदत मिळणार आहे. सर्वेक्षणानंतर रस्त्यांच्या गुणवत्तेसाठी आणि देखभालीसाठी कंत्राटदार व संबंधित अधिकारी या दोघांनाही जबाबदार धरले जाणार आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक.**

# खंडित वीजपुरवठ्याचे खापर फोडले पावसावर

## महावितरण अधिकाऱ्यांनी ढकलली जबाबदारी : लोकप्रतिनिधी-अधिकाऱ्यांच्या बैठकीत महावितरणबाबत नाराजी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळा असल्यामुळे भूमिगत वीजवाहिन्यांमध्ये पाणी शिरल्यामुळे वीजपुरवठा खंडित होत होता, असे स्पष्टीकरण देत महावितरण अधिकाऱ्यांनी देत आपली जबाबदारी ढकलल्याचे बैठकीत दिसून आले. यामुळे गणेशोत्सव, सणासुदीत तरी अखंड वीजपुरवठा सुरू राहणार का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. याबबात खबरदारी घेण्याची मागणी करत महावितरण अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यात आले.

गणेशोत्सव आणि पुढील सणासुदीच्या काळात विजेबाबत चर्चा करण्यासाठी महावितरणचे अधिकारी, स्थानिक नागरिकांची बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी खासदार श्रीरंग बारणे उपस्थित होते.वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याबरोबरच महावितरण कार्यालयात कोणी फोन उचलत नाही. कर्मचाऱ्यांकडून योग्य प्रतिसाद मिळत नाही, अशा तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. याची महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दखल घेण्याचे आश्वासन यावेळी दिले.



पुनावळे, ताथवडे, रावेत, वाकड या झपाट्याने वाढणाऱ्या भागासाठी नवीन सब स्टेशन सुरू करणे, ट्रान्सफॉर्मरची संख्या वाढवणे, जादा कर्मचारी उपलब्ध करणे आदी विषयांवरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या भागाची विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन त्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याची सूचनादेखील करण्यात आली. वारंवार होणारा खंडित वीजपुरवठा, कमी अधिक दाब, वायर तुटणे, एक फेज जाणे, ट्रान्सफॉर्मरवर लोड येणे अशा विविध बाबींवर चर्चा झाली.

पिंपरी-चिंचवड शहरातील वीज पुरवठा सुरळीत होण्याकरिता महावितरण अधिकाऱ्यांनी कार्यवाही करणार असल्याचे सांगितले. महावितरणचे अधीक्षक अभियंता शहाजीराव गायकवाड, कार्यकारी अभियंता सोमनाथ मुंडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता विश्वासराव भोसले, सांगवीचे कल्याण गिरी, भुजंग पवार, भोसरी विभागाचे अतुल देवकर, किरण सरोदे, रत्नदीप काळे, संतोष झोडगे, विनोद वाघमारे, माजी नगरसेवक संदीप वाघेरे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर आदी यावेळी उपस्थित होते.

### 'सूर्यघर' साठी पुढाकार हवा

**» केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसह विविध ग्राहकोपयोगी योजना समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत ग्राहकांना मोफत वीज मिळण्याबरोबरच, वीज विक्रीतून उत्पन्नाचे साधनही मिळणार आहे.**

एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये तर तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा जास्त प्रकल्पासाठी ७८ हजार रुपये अनुदान केंद्र शासनाकडून थेट ग्राहकांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते. गृहनिर्माण सोसायट्या व गृह संकुलांसाठी ९० लाखांपर्यंत अनुदान मिळणार आहे.

# पुण्यात गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाचाच 'आवाज'!

## गणेशोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांत शहरात सर्वच ठिकाणी आवाजाच्या पातळीने ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा ओलांडली

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांत शहरात सर्वच ठिकाणी आवाजाच्या पातळीने ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा ओलांडल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मोजण्यात आलेल्या ध्वनिपातळीतून हे स्पष्ट झाले आहे.



यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित लवादाने दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजली जात आहे. हे काम एका खासगी संस्थेला देण्यात आले आहे. या संस्थेने राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांच्या साह्याने ध्वनिप्रदूषण पातळी मोजण्यास सुरुवात केली आहे. दररोज सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ही पातळी मोजली जाते.

ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा पातळी दिवसा ७५ डेसिबल आणि रात्री ७० डेसिबलपर्यंत आहे. शहरात सर्वच ठिकाणी आवाजाची पातळी ७५ ते ८५ डेसिबलदरम्यान नोंदविण्यात आली आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात शहरभर ध्वनिप्रदूषण होत असल्याची बाब उघडकीस आली आहे.

गणेशोत्सवातील वाढत्या ध्वनिप्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत असल्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. कल्याणी मांडके यांनी लवादाकडे याचिका दाखल केली होती. यात राज्य सरकार, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे महापालिका आणि पुणे पोलिसांना प्रतिवादी करण्यात आले होते. पुण्यात गणेशोत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. यावर महाराष्ट्र प्रदूषण मंडळासह पुणे पोलिसांना ध्वनिप्रदूषण कमी करण्याचा आदेश देण्यात आला आहे. प्रत्येक गणेश मंडळाला १०० वॉटपेक्षा जास्त क्षमतेचे ध्वनिक्षेपक लावण्यास राष्ट्रीय हरित लवादाने बंदी घातली आणि ढोल-ताशा पथकात ३० पेक्षा जास्त वादकांचा समावेश करण्यास मनाई केली.

### आवाजाची मर्यादा पातळी

| विभाग | दिवसा | रात्री |
|---|---|---|
| औद्योगिक | ७५ | ७० |
| व्यावसायिक | ६५ | ५५ |
| निवासी | ५५ | ४५ |
| शांतता क्षेत्र | ५० | ४० |

> महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आवाजाची पातळी तपासली जात आहे. ही पातळी जास्त असल्यास पोलिसांशी संपर्क साधून गणेश मंडळाला आवाज कमी करण्याच्या सूचना केल्या जात आहेत. ढोल-ताशा पथकात ३० पेक्षा जास्त वादक नसावेत, या नियमाची अंमलबजावणी पोलिसांकडे सोपविण्यात आली आहे.
>
> **- जगन्नाथ साळुंके, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.**

# देवाची उरुळी येथील कचऱ्यावर प्रक्रियेचा मार्ग मोकळा

## देवाची उरुळी येथील डेपोमध्ये वर्षानुवर्षे साठलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याला विरोध करणाऱ्या ठेकेदाराची याचिका हायकोर्टाने फेटाळली

**पुणे | प्रतिनिधी**

देवाची उरुळी येथील डेपोमध्ये वर्षानुवर्षे साठलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याला विरोध करणाऱ्या ठेकेदाराची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. यामुळे सदर कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.



बायोमायनिंग करून कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याच्या निविदेच्या अटी-शर्तींमध्ये बदल करून ठराविक ठेकेदारांसाठी प्रशासन प्रयत्न करत असल्याचा आरोप एका ठेकेदाराने केला होता. त्या विरोधात ठेकेदाराने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, या ठेकेदाराची याचिका फेटाळत प्रशासनाने आरडीएफ निर्मिती करून शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात तसेच अनुभव आणि आर्थिक उलाढालीबद्दल ठेवलेल्या अटी योग्यच असल्याचे निकालात स्पष्ट केले आहे.

हरित लवादाच्या आदेशानुसार महापालिकेने २०१८ पासून देवाची उरुळी येथील कचरा डेपोत साठलेला लाखो टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यास सुरुवात केली आहे. येथील कचऱ्यावर प्रक्रिया करून जागा मोकळी करण्यात येत आहे. आतापर्यंत या कामासाठी दोन वेळा निविदा प्रक्रिया करून सुमारे २५ लाखाहून अधिक मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावून काही एकर जागा मोकळी करण्यात आली आहे. यापैकी शेवटच्या निविदेची मुदत या वर्षी फेब्रुवारीमध्ये संपली. यानंतर मात्र प्रशासनाकडून झालेला विलंब आणि लोकसभा निवडणूक आचारसंहितेमुळे विलंब होत गेला.

अखेर मागील महिन्यात सुमारे ८४ कोटी रुपयांच्या कामाची निविदा काढण्यात आली. यात महापालिकेने भाववाढ सूत्र आणि अनुभव आणि अन्य अटी पूर्वीप्रमाणेच ठेवत निविदा प्रसिद्ध केली. निविदापूर्व बैठकीमध्ये सुमारे २० ठेकेदार कंपन्या सहभागी झाल्या. यातील बहुतांश ठेकेदारांकडून प्रशासनाने काही ठेकेदारांना डोळ्यासमोर ठेवून अटीशर्ती ठेवल्याचा आरोप केला गेला. यापैकी बहुतांश ठेकेदार हे खासगी क्षेत्रात काम करणारे होते. दोन लाख टन आरडीएफ निर्मितीचा अनुभव, कंपनीची आर्थिक उलाढाल या अटींवर बहुतांश ठेकेदारांनी आक्षेप घेतला. परंतु महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आणि अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी अटीशर्तींमध्ये बदल करण्यास स्पष्ट नकार दिला. महापालिकेने वाहतूक खर्चाचा विचार करून भाववाढ सूत्रानुसारच पूर्वगणन पत्रक तयार केल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. महापालिकेच्या वतीने ॲड. ऋषिकेश एम. पेठे यांनी तर राज्य शासनाच्या वतीने ॲड. पी.पी. काकडे, ओ.ए. चांदूरकर आणि ॲड. जी.आर. रघुवंशी यांनी बाजू मांडली.

### पूर्वानुभवाची अट न्यायालयाने ठरवली योग्य

» यानंतर या विरोधात एका ठेकेदाराने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. दोन दिवसांपूर्वी झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित कुमार यांनी सदर ठेकेदाराने केलेली याचिका निकाली काढली. पालिका प्रशासनाच्या अटी शर्ती केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व नागरी व्यवहार मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नाहीत, याचे पुरावे या ठेकेदाराला सादर करता आले नाहीत. कचऱ्यापासून तयार करण्यात येणाऱ्या आरडीएफची योग्य पद्धतीने विल्हेवाट न लावल्यास जल आणि वायुप्रदूषण होते. यामुळे आरडीएफ हे सिमेंट आणि वीज व तत्सम इंधन निर्माण करणाऱ्या प्रकल्पांमधील बॉयलरसाठी वापरण्यास केंद्रीय आरोग्य आणि पर्यावरण मंत्रालयाची तसेच राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळाचीही परवानगी असल्याचा दाखला देत न्यायालयाने महापालिका प्रशासनाने घातलेली अट योग्यच असल्याचे निकालात नमूद केले.